ही जाहिरात भारताचे राष्ट्रपती यांच्या वतीने आणि त्यांच्या करिता अवजड उद्योग मंत्रालय भारत सरकार, नवी दिल्ली यांच्या माध्यमातून ऑफरचे व्यवस्थापक (**व्यवस्थापक**) कॉर्पोरेट प्रोफेशनल्स कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड यांच्याकडून जारी करण्यात येत आहे आणि श्री अमित श्रीवास्तव, कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक (**सीएमडी**) (यापुढे ज्यांचे उल्लेख **ऍक्वायरर** असा करण्यात येणार आहे ) यांच्याकडून त्यांचे प्रतिनिधित्व करण्यात येत आहे आणि त्यांच्याकडून स्कुटर्स इंडिया लिमिटेड (**कंपनी**) यांच्या सार्वजनिक समभागधारकांसाठी जरी करण्यात येत आहे आणि त्याचा उद्देश : (ए) सार्वजनिक समभागधारकांकडे असलेले सर्व ते समभाग संपादित करणे आणि (बी) बीएसई लिमिटेड ( बीएसई / स्टॉक एक्स्चेंज) येथून स्वयंस्फूर्तीने कंपनीचे समभाग असूचिबद्ध करणे, जे एकमेव स्टॉक एक्स्चेंज आहे जिथे कंपनीचे इक्विटी समभाग सध्या सूचिबद्ध आहेत. आणि त्यासाठी सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया यांनी पत्र क्रमांक सेबी / एचओ / सीएफडी / डीसीआर ३ / ओडब्ल्यू / २०२१/ २६९०८/ १ दिनांकीत ०४ ऑक्टोबर २०२१ (**एक्झेम्पशन लेटर १**) तसेच त्यासह वाचा पत्र क्रमांक सेबी / एचओ / सीएफडी /डीसीआर ३/ ओडब्ल्यू / २०२३/ २५०८/ १ दिनांकीत १८ जानेवारी २०२३ (**एक्झेम्पशन लेटर २**), पत्र क्रमांक सेबी / एचओ / सीएफडी / आरए सी / डीसीआर २/ पी / ओडब्ल्यू /२०२३ १७८६/ १ दिनांकीत ०२ मे २०२३ (**एक्झेम्पशन लेटर ३**) यांच्या अनुसार तसेच भविष्यातील सवलती ज्या सेबी यांच्याकडून प्राप्त होतील (**एक्झेम्पशन लेटर**) यांच्या अनुसार तसेच सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया ( **डीलीस्टिंग ऑफ इक्विटी शेअर्स** ) नियम २०२१ ( **डीलीस्टिंग रेग्युलेशन्स** )यांच्या अनुसार मंजूर करण्यात आलेल्या सवलतींच्या अनुसार डीलीस्टिंग ऑफर तयार करणे. ( **डीलीस्टिंग प्रपोजल किंवा डीलीस्टिंग ऑफर** )

**१. डीलीस्टिंग ऑफरची पार्श्वभूमी**

१. १ ऍक्वायरर हे ही डीलीस्टिंग ऑफर ५३,४८,२२६ इक्विटी समभाग ( **ऑफर समभाग**) जे कंपनीच्या पेड अप इक्विटी समभाग भांडवलाच्या ६. १३ % समभागांचे प्रतिनिधित्व करतात ते सार्वजनिक समभागधारकांकडून संपादित करण्यासाठी डीलीस्टिंग ऑफर तयार करीत आहेत आणि ही प्रक्रिया डीलीस्टिंग रेग्युलेशन्सचा खंड ६ प्रमाणे हाती घेण्यात येत आहे.

१. २ भारत सरकार ( **जीओआय** ), अवजड उद्योग मंत्रालय, नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक एफ क्रमांक ३ (१) / २०२० – पी इ –६, दिनांकीत २८ जानेवारी २०२१, च्या अनुसार कंपनीच्या प्लांट आणि युनिटचे आणि कंपनी बंद करण्याचा निर्णय कळविला आहे. त्याच प्रमाणे भारत सरकारच्या सदरील पत्राच्या अनुसार यांनी असेही कळविले आहे की कंपनी कायदा २०१३ कलम २४८ (२) च्या अनुसार कंपनी बंद करण्याच्या पूर्वी कंपनीचे समभाग भांडवली बाजारातून असूचिबद्ध करणे आवश्यक आहे आणि सार्वजनिक गुंतवणूकदारांकडे असलेले समभाग संपादित करणे आणि सार्वजनिक समभागधारकांना भारत सरकारकडून डीलीस्टिंग रेग्युलेशन मध्ये नमूद करण्यात आलेल्या प्रक्रियेच्या अनुसार पे आउट देणे आवश्यक आह. त्या संदर्भात **श्री. अमित श्रीवास्तव**, कंपनीचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक (**सीएमडी**) यांना प्रस्तावित स्वयंस्फूर्त डीलीस्टिंगसाठी ऍक्वायरर यांच्या वतीने आवश्यक ती प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी प्राधिकृत करण्यात आले आहे.

१. ३ त्याच्या अनुसार कंपनीने दिनांक ०५ जुलै २०२१ रोजी प्रस्तावित डीलीस्टिंग प्रस्तावासाठी मर्चंट बँकरच्या नियुक्तीसाठी निविदा जारी केली. वरीलप्रमाणे नमूद केल्याच्या अनुसार तसेच त्यासह वाचा डीलीस्टिंग रेग्युलेशन्सचा नियम ९ च्या तरतुदींच्या अनुसार ऍक्वायरर यांनी कॉर्पोरेट प्रोफेशनल्स कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड यांची नियुक्ती प्रस्तावित डीलीस्टिंग प्रपोजलसाठी व्यवस्थापक म्हणून केली आहे.

१. ४ सीएमडी यांनी ऍक्वायरर यांच्या वतीने पत्र दिनांकीत ०३ मे २०२३ च्या अनुसार डीलीस्टिंग रेग्युलेशन्सच्या अनुसार कंपनीचे सार्वजनिक समभागधारक यांच्याकडे असलेले समभाग संपादित करून कंपनीचे ते समभाग स्वयंस्फूर्तीने डीलीस्ट करण्याची इच्छा प्रदर्शित केली होती.

१. ५ वरीलप्रमाणे आणि डीलीस्टिंग रेग्युलेशन्सच्या नियम ८ च्या तरतुदींच्या अनुसार प्रारंभिक सार्वजनिक घोषणा ( **आयपीए**) व्यवस्थापक यांच्याकडून ऍक्वायरर यांच्या वतीने आणि त्यांच्या करिता ०३ मे २०२३ रोजी, लागू असलेल्या कायद्यांच्या तरतुदींच्या अनुसार डीलीस्टिंग प्रपोजल घेण्याची इच्छा प्रदर्शित केली होती आणि डीलीस्टिंग रेग्युलेशन्स तसेच एक्झेम्पशन लेटर्सच्या अनुसार स्वयंस्फूर्तीने कंपनीचे समभाग भांडवली बाजारातून असूचिबद्ध करण्यासाठी ऑफर दिली होती.

१. ६ आयपीए प्राप्त झाल्यानंतर कंपनीने स्टॉक एक्स्चेंज यांना १७ मे २०२३ रोजी अधिसूचित केले की कंपनीच्या संचालक मंडळाची बैठक दिनांक २२ मे २०२३ रोजी झाली. त्यानंतर संचालक मंडळाची बैठक २४ मे २०२३ पर्यंत तहकूब करण्यात आली. ज्या बैठकीत डीलीस्टिंग प्रपोजलवर विचार करण्यात आला आणि त्याला मान्यता देण्यात आली.

१. ७ कंपनीने डीलीस्टिंग रेग्युलेशन्स च्या नियम १० (२) च्या अनुसार सीएस अमित गुप्ता, प्रॅक्टिसिंग कंपनी सेक्रेटरी यांची नियुक्ती पिअर रिव्ह्यूड कंपनी सेक्रेटरी म्हणून केली.

१. ८ एक्झेम्पशन लेटर्सच्या अनुसार तसेच त्यासह वाचा त्यात नमूद करण्यात आलेल्या अटी आणि शर्तींच्या अनुसार आणि डीलीस्टिंग रेग्युलेशन्स चा नियम २० तसेच त्यासह वाचा सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया ( सबस्टॅन्शिअल ऍक्विझिशन ऑफ शेअर्स अँड टेकओव्हर ) नियम २०११ (**टेक ओव्हर रेग्युलेशन्स** ) चा नियम ८ च्या अनुसार कंपनीचे योग्य मूल्य निर्धारित करण्यासाठी फ्लोअर किंमत रु ३१. ७८/ – प्रति समभाग निर्धारित करण्यात आली. त्यानंतर सीएमडी यांनी ऍक्वायरर यांच्या वतीने अवजड उद्योग मंत्रालय, भारत सरकार नवी दिल्ली यांना प्रस्तावित स्वयंस्फूर्त डीलीस्टिंग करिता फ्लोअर किमतीला मान्यता देण्यासाठी पत्र लिहिले आणि मंत्रालय यांनी त्यांचे पत्र दिनांकीत ०९ फेब्रुवारी २०२३ च्या अनुसार फ्लोअर मूल्य रु ३१. ७८ /– प्रति समभाग ला मान्यता दिली.

१. ९ कंपनीच्या संचालक मंडळाने त्यांच्या २४ मे २०२३ रोजी झालेल्या बैठकीत खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या बाबींची दप्तरी नोंद घेतली.

१. सेबी यांनी एक्झेम्पशन लेटर्सच्या माध्यमातून दिलेल्या विविध सवलती

२. पिअर रिव्ह्यू कंपनी सेक्रेटरी अमित गुप्ता आणि असोसिएट्स यांनी सादर केलेला ड्यू डिलिजन्स रिपोर्ट दिनांकीत २४ मे २०२३

३ विविध घटक आणि डीलीस्टिंगचे फायदे यांच्यावर सखोल विचार करून कंपनीच्या संचालक मंडळाने डीलीस्टिंग रेग्युलेशन्स चा नियम १० (४) च्या अंतर्गत त्यांची मान्यता दिली आणि भांडवली बाजारातून कंपनीचे समभाग असूचिबद्ध करण्यासाठी शिफारस केली आणि टपाली मतदान पद्धतीने त्यासाठी समभागधारकांची मान्यता घेण्याची शिफारस केली. संचालक मंडळाने मान्य केले की :

ए) कंपनीने प्रतिभूती कायद्याच्या सर्व त्या तरतुदींचे पालन केले आहे नियम १७ (१), नियम ३१, नियम ३८, नियम १०७, नियम १०८ वगळून तसेच सिक्युरिटी अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लीजर रिक्वायरमेंट्स ) नियम २०१५ चा नियम ६ ( **लिस्टिंग रेग्युलेशन्स** )

बी) ऍक्वायरर हे डीलीस्टिंग रेग्युलेशन्स नियम ४ (५) ची पूर्तता करीत आहेत.

सी) प्रस्तावित डीलीस्टिंग हे कंपनीच्या समभागधारकांच्या हितासाठी आहे.

१. १०. कंपनीने समभागधारकांना टपाली मतदान पद्धतीने त्यांची मान्यता घेण्यासाठी टपाली मतदान सूचना आणि इ मतदान सूचना ०५ जून २०२३ रोजी निर्गमित करण्याची प्रक्रिया पूर्ण केली.

१. ११ दिनांक ०७ जुलै २०२३ रोजी टपाली मतदानाच्या निकालांची घोषणा करण्यात आली. त्याचप्रमाणे बीएसई यांनी त्यांचे पत्र दिनांकीत ३० ऑक्टोबर २०२३ च्या अनुसार आणि डीलीस्टिंग रेग्युलेशन्स चा नियम १२ च्या अनुसार डीलीस्टिंग ऑफरला त्यांची इन प्रिन्सिपल मान्यता दिली.

१. १२ या जाहीर सूचनेच्या तारखेला, ऍक्वायरर यांच्याकडे ८,१९,२४,०२९ इक्विटी समभाग आहेत आणि ते एकूण पेड अप इक्विटी समभाग भांडवलाच्या ९३. ८७% समभागांचे प्रतिनिधित्व करतात. आणि कंपनीचे सार्वजनिक समभागधारक यांच्याकडे ५३,४८,२२६ इक्विटी समभाग आहेत आणि ते कंपनीच्या एकूण पेड अप समभाग भांडवलाच्या ६. १३ % भागाचे प्रतिनिधित्व करतात.

१. १३ ऑफरच्या अनुसार ऍक्वायरर हे ५३,४८,२२६ समभाग संपादित करू इच्छित आहेत जे कंपनीच्या एकूण पेड अप समभाग भांडवलाच्या ६. १३% समभागांचे प्रतिनिधित्व करतात आणि ते समभाग सार्वजनिक समभागधारक यांच्याकडे आहेत आणि ते ते कंपनीचे सर्व समभागधारक प्रवर्तक आणि प्रवर्तक समूह यांच्या व्यतिरिक्त समभागधारक आहेत डीलीस्टिंग रेग्युलेशन्सच्या अनुसार.

१. १४ त्याचप्रमाणे ऑफरच्या अनुसार डीलीस्टिंग रेग्युलेशन्सच्या तरतुदींच्या अनुसार तसेच त्यासह वाचा लेटर ऑफ ऑफरमध्ये नमूद करण्यात आलेल्या अटी आणि शर्तींच्या अनुसार आणि अन्य डीलीस्टिंग ऑफर्सशी संबंधित अन्य प्रपत्रांच्या अनुसार स्टॉक एक्स्चेंज येथून कंपनीचे समभाग असूचिबद्ध करण्यासाठी अर्ज करता येईल. त्याचप्रमाणे इक्विटी समभाग स्टॉक एक्स्चेंज येथून स्वेच्छेने असूचिबद्ध होतील.

१. १५. ही जाहीर सूचना (पीए) एक्झेम्पशन लेटर १ आणि डीलीस्टिंग रेग्युलेशन्सच्या अनुसार खालीलप्रमाणे नमूद केलेल्या वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात येत आहे.

| वृत्तपत्र | भाषा | आवृत्ती |
|---|---|---|
| द फिनान्शिअल एक्स्प्रेस | इंग्रजी | संपूर्ण भारत |
| जनसत्ता | हिंदी | संपूर्ण भारत |
| डेली एक्सेलसीअर | इंग्रजी | जम्मू आणि श्रीनगर |
| डेली आफताब | उर्दू | श्रीनगर |
| दैनिक जागरण | हिंदी | संपूर्ण उत्तर प्रदेश आणि उत्तराखंड |
| विजयवाणी | कन्नड | कर्नाटक |
| संदेश | गुजराती | गुजरात |
| दैनिक भास्कर | हिंदी | मध्य प्रदेश आणि छत्तीसगड, राजस्थान, हरियाणा, पंजाब, चंदीगड + हिमाचल प्रदेश, बिहार + झारखंड |
| लोकसत्ता | मराठी | महाराष्ट्र |
| पुण्यनगरी | मराठी | महाराष्ट्र |
| बर्तमान | बंगाली | पश्चिम बंगाल |
| तेलगू जे. डी. वार्ता | तेलुगू | आंध्र प्रदेश + तेलंगणा |
| द हिंदू | तामिळ | तामिळनाडू |
| केरळ कौमुदी | मल्याळम | केरळ |
| विजयवाणी | कन्नड | कर्नाटक |

**२. प्रस्तावित डीलीस्टिंगचे तर्क आणि उद्दिष्टे**

प्राथमिक सार्वजनिक घोषणेमध्ये ऍक्वायरर यांनी डीलीस्टिंग ऑफरच्या संदर्भात खालीलप्रमाणे नमूद केलेले तर्क आणि स्पष्ट केले आहेत.

२. १ भारत सरकार, अवजड उद्योग मंत्रालय (**एमएचआय**) नवी दिल्ली यांचे पत्र क्रमांक एफ क्रमांक ३ (१)/ २०२०– पीई – ६ दिनांकीत २८ जानेवारी २०२१ च्या अनुसार असे ठरविण्यात आले की कंपनीच्या प्लांट आणि युनिटमधील काम बंद करण्यात यावे आणि कंपनी बंद करण्यात यावी.

२. २ त्याच पत्राच्या अनुसार अवजड उद्योग मंत्रालयाने बीएसई लिमिटेड येथून कंपनीचे संभा डीलीस्ट करण्यासाठी मान्यता दिली. कंपनी बंद करण्यापूर्वी आणि कंपनी कायदा २०१३ चे कलम २४८ (२) च्या अनुसार

२. ३ वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेल्या पत्राच्या अनुसार आवश्यक त्या उपाययोजना हाती घेण्यात आल्या.

२. ४ अवजड उद्योग मंत्रालय यांनी निर्णयाच्या अनुसार कंपनी कायदा २०१३ कलम २४८ (२) च्या तरतुदींच्या अनुसार कंपनी विसर्जित करणे आवश्यक होते.

२. ५ त्याचप्रमाणे कंपनीचे पेड अप इक्विटी समभाग भांडवल रु ८७,२७,३८,१८८ रु इतके आहे आणि ते दर्शनी मूल्य रु १० /– प्रति समभाग असलेल्या ८,७२,७२,२५५ समभागांमध्ये विभागण्यात आले आहे. कंपनीच्या एकूण पेड अप समभाग भांडवलात प्रवर्तक यांची समभाग धारणा ९३. ८७% इतकी आहे तर सार्वजनिक समभागधारक यांची धारणा अवघी ६. १३ % इतकी आहे. कंपनीच्या समभागांचे व्यवहार अत्यंत तुरळक आहेत. आणि बीएसई लिमिटेड यांच्याकडे सूचिबद्ध असल्याचा कंपनीला कोणताही फायदा झालेला नाही. कंपनीच्या इक्विटी समभागांचे सध्या अत्यंत तुरळक व्यवहार होत आहेत आणि गेल्या १२ महिन्यांच्या कालावधीत ते अवघे १. ७९ % इतके आहेत.

२. ६ स्टॉक एक्स्चेंजमध्ये कंपनीच्या समभागांची प्रवाहता पाहता, प्रस्तावित डीलीस्टिंगमुळे डीलीस्टिंग रेग्युलेशन्सच्या तरतुदींच्या अनुसार निर्धारित करण्यात आलेल्या किमतीच्या अनुसार कंपनीतून बाहेर पडण्याची संधी सार्वजनिक समभागधारकांना उपलब्ध होणार आहे.

**३. सेबी एक्झेम्पशन लेटर**

ऍक्वायरर यांनी सेबीकडे मागितलेल्या सवलती खालीलप्रमाणे नमूद करण्यात आल्यानुसार आहेत.

३. १ सिक्युरिटीज अँड एक्स्चेंज बोर्ड ऑफ इंडिया यांनी एक्झेम्पशन पत्र क्रमांक **सेबी / एचओ / सीएफडी / डीसीआर ३ / ओडब्ल्यू / २०२१/ २६९०८/ १ दिनांकीत ०४ ऑक्टोबर २०२१ तसेच त्यासह वाचा पत्र क्रमांक सेबी / एचओ / सीएफडी /डीसीआर ३/पी/ ओडब्ल्यू / २०२३/ २५०८/ १ दिनांकीत १८ जानेवारी २०२३ आणि पत्र क्रमांक सेबी / एचओ / सीएफडी / आरएसी / डीसीआर २/ पी / ओडब्ल्यू /२०२३ /१७८६/ १ दिनांकीत ०२ मे २०२३** यांच्या अनुसार प्रस्तावित डीलीस्टिंगसाठी अनेक सवलती दिल्या आहेत. या पत्रांच्या अनुसार देण्यात आलेल्या सवलतींचा तपशील खालील प्रमाणे नमूद करण्यात आल्यानुसार आहे.

३.१. १ डीलीस्टिंग रेग्युलेशनच्या नियम १२ (४) (डी) च्या तरतुदींपासून सवलत, ज्याच्या अनुसार सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स ) नियम २०१५ (एलओडीआर रेग्युलेशन्स) च्या तरतुदींची पूर्तता करणे आवश्यक होते. एलडीआर रेग्युलेशन्सच्या विविध तरतुदींपासून सेबीने सवलती दिल्या आहेत ज्यांचा तपशील खालीलप्रमाणें नमूद केल्यानूसार आहे.

३.१.१.१ एलडीआर रेग्युलेशन २०१५ चा नियम १७ (१) च्या अनुसार कंपनीच्या संचालक मंडळाच्या पैकी अर्धे संचालक मंडळ स्वतंत्र संचालक असणे आवश्यक होते.

३.१.१.२ एलओडीआर रेग्युलेशन २०१५ चा नियम ३१ च्या अनुसार प्रवर्तक आणि प्रवर्तक समूह यांच्याकडील समभाग धारणा १०० % स्वरूपात डिमॅट स्वरुपात असणे आवश्यक होते आणि सेबीने सुनिश्चीत केल्यानुसार ते अखंडित असणे आवश्यक होते.

३.१.१.३ एलओडीआर रेग्युलेशन २०१५ चा नियम ३८ तसेच त्यासह वाचा सिक्युरिटीज कॉंट्रॅक्ट्स (रेग्युलेशन्स ) नियम १९५७चा नियम १९ (२) आणि नियम १९ ए ज्याच्या अनुसार सेबीकडून वेळोवेळी निश्चित करण्यात आलेल्या सार्वजनिक समभाग धारणेच्या आवश्यकतांची पूर्तता करणे आवश्यकता होती.

३.१.१.४ एलओडीआर रेग्युलेशन २०१५ चा नियम १०७ आणि १०८ ज्याच्या अनुसार प्रतिभूती भांडवली बाजारात सूचिबद्ध असणे आवश्यक होते.

३.१.१.५ एलओडीआर रेग्युलेशन २०१५ चा नियम ६ ज्याच्या अनुसार कंपनीने पात्र कंपनी सेक्रेटरी कम्प्लायन्स अधिकारी म्हणून नियुक्त करणे आवश्यक होते.

३.१.२ त्याचप्रमाणे डीलीस्टिंग रेग्युलेशन्स चा नियम ३५ (१) मध्ये सुनिश्चित करण्यात आलेल्या छोट्या कंपन्यांसाठीच्या पात्रतेच्या निकषांतून सवलत मागण्यात आली होती कंपनीचे नक्त मूल्य ३१ मार्च २०२१ रोजी रु ५०. २४ लाख इतके होते जे पात्रतेचे निकष पूर्ण करीत होते मात्र पेड अप समभाग भांडवल रु ८७. २७ कोटी रुपये इतके होते जे डीलीस्टिंग रेग्युलेशन्स चा नियम ३५ (१) मध्य नमूद करण्यात आलेल्या मर्यादेपेक्षा जास्त होते

३.१.३ डीलीस्टिंग रेग्युलेशन्सचा नियम ४२ पासून सवलत ज्याच्या अनुसार स्वेच्छा डीलीस्टिंगसाठीची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी ३१ डिसेंबर २०२३ ही कालमर्यादा निश्चित करण्यात आली होती. आणि त्यात वाढ मागण्यात आली.

३.१.४ सार्वजनिक समभागधारकांकडून इंडीकेटीव्ह मूल्य आमंत्रित करण्यापासून आणि सार्वजनिक समभागधारक ज्यांच्याकडे सार्वजनिक समभाग धारणेच्या ९० % किंवा त्यापेक्षा अधिक समभाग धारणा आहे त्यांच्या संमतीपासून सवलत खालील अटींच्या अनुसार.

३.१.४.१ ऑफरसाठी ऍक्वायरर व्यवस्थापकाची नियुक्ती करू शकतात आणि सल्लामसलत केल्यानंतर बाहेर पडण्यासाठीचे मूल्य सुनिश्चित करू शकतात. सार्वजनिक समभागधारकांना देण्यात येणारी किंमत ही फ्लोअर मूल्यापेक्षा कमी असणार नाही जी टेक ओव्हर रेग्युलेशन्सचा नियम ८ आणि उप नियम (२) च्या मुद्यानुसार निर्धारित करण्यात आली आहे.

३.१.४.२ ऍक्वायरर हे कंपनीच्या सार्वजनिक समभागधारकांशी व्यक्तिशः पत्रव्यवहार करतील आणि त्यांना इक्विटी समभाग असूचिबद्ध करण्याचे उद्देश, एक्झिट प्राईस तसेच त्यासह त्याचे स्पष्टीकरण देतील आणि डीलीस्टिंगच्या या प्रस्तावासाठी त्यांची मान्यता आमंत्रित करतील.

३.१.४.३ सार्वजनिक समभागधारकांशी करण्यात आलेल्या पत्रव्यवहारात ऑफर मूल्याचे स्पष्टीकरण तसेच लागू असलेल्या मापदंडांची माहिती आणि विशेषता असे नमूद करण्यात येईल प्रस्तावाला देण्यात आलेल्या संमतीमध्ये रिव्हर्स बुक बिल्डिंग पद्धतीने आणि त्याच्या माध्यमातून डिस्पेंसिंग एक्झिट प्राईसला सहमती दर्शविण्यात आली आहे.

३.१.४.४ त्याच्या इक्विटी शेअर्सच्या डीलिस्टिंगच्या अनुषंगाने, प्रवर्तकांनी असे इक्विटी शेअर्स /ारण केलेल्या कोणत्याही उर्वरित सार्वजनिक भाग/ारकाने निविदा केलेले शेअर्स, डीलिस्टिंगच्या तारखेपासून २ वर्षांच्या कालाव/ीसाठी ज्या किमतीला आ/ी स्वीकारले होते त्याच किमतीवर स्वीकारणे सुरू ठेवावे. शेअर्स केले होते.

३.१.४.५ ऑफरचे व्यवस्थापक ऍक्वायरर यांच्या समन्वयातून असे सुनिश्चित करतील की उर्वरित सार्वजनिक समभागधारकांच्या हिताचे संरक्षण करण्यात आले आहे आणि त्यात पुढील बाबींचा समावेश असेल

३.१.४.५.१ इक्विटी समभागांच्या डीलीस्टिंगच्या सार्वजनिक घोषणेची जाहिरात ज्या वृत्तपत्रात प्रकाशित करण्यात आली आहे त्याच वृत्तपत्रांमध्ये दर तीन महिन्यांनी जाहिरात प्रसिद्ध करण्यात येईल आणि उर्वरित सार्वजनिक समभागधारकांना समभागांच्या असूचिबद्धतेनंतर दोन वर्षांच्या एक्झिट विंडोच्या कालावधीत एक्झिटची संधी घेण्यासाठी आवाहन करण्यात येईल.

३.१.४.५.२ उर्वरित सार्वजनिक समभागधारकांना दर तीन महिन्यांनी पाठपुराव्यासाठी पत्रव्यवहार करण्यात येईल.

३.१.४.५.३ दर तीन महिन्यांनी भांडवली बाजाराला प्रगती अहवाल पाठविण्यात येईल आणि तो जनतेला भांडवली बाजाराकडून कळविण्यात येईल ज्या खालील बाबी स्पष्ट करण्यात येतील.

ए) तिमाहीचे सुरुवातीला आणि शेवटी उर्वरित सार्वजनिक समभागधारकांची संख्या

बी) तिमाहीत एक्झिट संधीचा उपयोग केलेल्या सार्वजनिक समभागधारकांचा तपशील

**४ कंपनीचा सध्याचा आणि अपेक्षित भांडवल आराखडा आणि समभागधारणा आराखडा**

४.१ वृत्तपत्रात प्रकाशनाच्या तारखेला कंपनीचे प्राधिकृत समभाग भांडवल रु २,५०,००,००,००० इतके आहे आणि दर्शनी मूल्य रु १० /– प्रति समभाग असलेल्या २५,००,००,००० समभागांच्या संख्येमध्ये विभागलेले आहे. कंपनीचे इश्यूड समभाग भांडवल रु ८७,२७,३८,१८८ इतके आहे आणि ते दर्शनी मूल्य रु १० /– प्रति समभाग असलेल्या ८,७२,७२,२५५ समभागांमध्ये विभागलेले आहे.

४.२ सार्वजनिक घोषणेच्या तारखेला समभागधारणा आराखडा खालील प्रमाणे नमूद केल्यानुसार आहे.

| . | पूर्वी | | पश्चात | |
|---|---|---|---|---|
| तपशील | समभागांची संख्या | % | समभागांची संख्या | % |
| प्रवर्तक आणि प्रवर्तक समूह | ८,१९,२४,०२९ | ९३. ८७ | ८,७२,७२,२५५ # | १००. ०० |
| प्रवर्तकांकडील एकूण समभाग धारणा (ए) | ८,१९,२४,०२९ | ९३. ८७ | ८,७२,७२,२५५ | १००. ०० |
| एकूण सार्वजनिक समभाग धारणा (बी) | ५३,४८,२२६ | ६. १३ | निरंक | ०. ०० |
| एकूण ( ए + बी) | ८,७२,७२,२५५ | १००. ०० | ८,७२,७२,२५५ | १००. ०० |

#प्रस्तावित डीलीस्टिंग ऑफरमध्ये १००% सहभाग गृहीत धरून

पुढे पहा .......

४.३ कंपनीचे एकूण पेड अप समभाग भांडवल म्हणजेच ८,७२,७२,२५५ इक्विटी समभागांपैकी १९,९०,०१० इक्विटी समभाग बीएसई यांच्याकडे सूचिबद्ध आहेत आणि उर्वरित ८,१९,२४,०२९ समभाग ऍक्वायरर यांना वितरित करण्यात आले आहेत आणि ३३,६१,४६१ इक्विटी समभाग स्पेशल नॅशनल इन्व्हेस्टमेंट फंड यांच्याकडे आहेत आणि ते असूचिबद्ध आहेत आणि सेबी यांनी एक्झेम्पशन लेटर क्रमांक १ च्या अनुसार त्यांना सवलत दिली आहे.

**५. फ्लोअर प्राईस आणि एक्झिट प्राईस ठरविण्याची प्रक्रिया**

५.१ एक्झेम्पशन लेटरमध्ये नमूद करण्यात आलेल्या अटींच्या आणि शर्तींच्या अनुसार ऍक्वायरर यांना कंपनीच्या इक्विटी समभागांचे मूल्य दोन स्वतंत्र पिअर रिव्ह्यू सनदी लेखापालांकडून मिळविण्यास सांगण्यात आले होते आणि डीलीस्टिंग करिता फ्लोअर प्राईस दोन व्हॅल्युअरनी दिलेल्या मूल्यापैकी अधिक मूल्यापेक्षा कमी असणार नाही, असे कळविले होते.

५.२ त्याच्या अनुसार ऍक्वायरर यांनी दोन पिअर रिव्ह्यूड सनदी लेखापालांची नियुक्ती केली ज्यांची नावे मेसर्स सचिन अँड असोसिएट्स (पिअर रिव्ह्यू प्रमाणपत्र क्रमांक ०१०९२९ आणि एफआरएन ०१५०९०सी आणि मेसर्स ओम रस्तोगी अँड कंपनी (पिअर रिव्ह्यू प्रमाणपत्र क्रमांक ०११३०० आणि एफआरएन : ००२६०४ सी) यांची नियुक्ती डेसिटिंग रेग्युलेशन्सचा नियम २० तसेच त्यासह वाचा टेक ओव्हर रेग्युलेशन्स चा नियम ८ च्या अनुसार कंपनीची योग्य किंमत ठरविण्यासाठी केली होती आणि त्यांनी त्यांचे प्रमाणपत्र दिनांकीत १९ सप्टेंबर २०२२ आणि ०३ ऑक्टोबर २०२२ च्या अनुसार फ्लोअर प्राईस ३१. ७८/ – आणि ३८. २५/– प्रति समभाग अनुक्रमाने निर्धारित केली आहे.

५.३ त्यानंतर सीएमडी यांनी ऍक्वायरर यांच्या वतीने अवजड उद्योग मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांच्याकडे प्रस्तावित स्वेच्छा डीलीस्टिंग प्रक्रियेला मान्यता देण्यासाठी अर्ज केला आणि मंत्रालय यांनी त्यांचे पत्र दिनांकीत ०९ फेब्रुवारी २०२३ च्या अनुसार फ्लोअर प्राईस प्रति समभाग रु ३१. ७८ /– ला मान्यता दिली.

५.४ वरील संदर्भात संचालक मंडळाने ऍक्वायरर यांचे पत्र दिनांकीत २४ मे २०२३ तसेच कॉर्पोरेट प्रोफेशनल्स कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड, डीलीस्टिंग ऑफर करिता व्यवस्थापक यांचे पत्र दाखल करून घेतले ज्यात डीलीस्टिंग ऑफर करिता मूल्य रु ३१. ७८ ( रुपये एकतीस पैसे अठ्याहत्तर मात्र ) प्रति समभाग निश्चित करण्याचे कंपनीला कळविण्यात आले होते आणि ही प्रक्रिया डीलीस्टिंग रेग्युलेशन्स नियम २० (२) तसेच त्यासह वाचा टेक ओव्हर रेग्युलेशन्स चा नियम ८ आणि एक्झेम्पशन लेटर्सच्या अनुसार पूर्ण करण्यात आली आहे.

५.५ त्याच प्रमाणे डीलीस्टिंग रेग्युलेशन्स चा नियम ३५ (२) च्या तरतुदींच्या अनुसार तसेच त्यासह वाचा सेबी यांनी दिलेली एक्झेम्पशन लेटर्स यांच्या अनुसार आणि सार्वजनिक समभागधारकांच्या हितासाठी ऍक्वायरर यांनी ऑफर करिता व्यवस्थापक यांच्याशी चर्चा करून एक्झिट मूल्य रु ३१. ७८ /– प्रति समभाग निर्धारित केले जे टेक ओव्हर रेग्युलेशन चा नियम ८ (२) (इ) च्या अनुसार निर्धारित करण्यात आलेल्या फ्लोअर मूल्यापेक्षा कमी नाही.

५.६ फ्लोअर मूल्य आणि एक्झिट मूल्य संचालक मंडळाच्या दिनांक २४ मे २०२३ रोजी झालेल्या बैठकीचे फलित म्हणून कंपनीकडून स्टॉक एक्स्चेंज यांना कळविण्यात आले आहे.

**६. डीलीस्टिंग ऑफरच्या वैधतेचा कालावधी**

६.१ एक्झेम्पशन लेटर्सच्या अनुसार ऍक्वायरर हे उर्वरित सार्वजनिक समभागधारकांकडून डीलीस्टिंगच्या तारखेपासून दोन वर्षांपर्यंत, या आधी निर्धारित करण्यात आलेल्या मूल्याला समभाग स्वीकारू शकतात.

६.२ ऍक्वायरर यांनी असे सुनिश्चित करणे आवश्यक आहे की उर्वरित सार्वजनिक समभागधारकांच्या हिताचे संपूर्ण संरक्षण झाले आहे तसेच डीलीस्टिंग रेग्युलेशन्स चा नियम २७ आणि एक्झेम्पशन लेटर्स यांची पूर्तता करणे आवश्यक आहे आणि स्टॉक एक्स्चेंज या संपूर्ण प्रक्रियेवर लक्ष ठेवतील.

**७ एस्क्रो खात्याचा तपशील तसेच त्यात भरणा केल्याच्या रकमेचा तपशील**

७.१ डीलीस्टिंग रेग्युलेशन्सच्या अनुसार निर्धारित करण्यात आलेले देय मूल्य म्हणजेच एक्झिट मूल्य रु ३१. ७८ /– ( भारतीय रुपयात एकतीस पैसे अठ्याहत्तर मात्र) प्रति समभाग गुणिले ऑफर करण्यात आलेले समभाग म्हणजे ५३,४८,२२६ इक्विटी समभाग मूल्य रु १६,९९,६६,६२२. २८/– ( भारतीय रुपये सोळा कोटी नव्यान्नव लाख सहासष्ट हजार सहाशे बावीस पैसे अठ्ठावीस मात्र) (एस्क्रो रक्कम)

७.२ डीलीस्टिंग रेग्युलेशन्स आणि एक्झेम्पशन लेटर्सच्या अनुसार ऍक्वायरर, ऍक्सिस बँक लिमिटेड (एस्क्रो बँक) आणि ऑफर व्यवस्थापक यांनी एस्क्रो करारनामा दिनांकीत १३ जुलै २०२३ केला आहे आणि त्याच्या अनुसार ऍक्वायरर यांनी स्कुटर्स इंडिया लिमिटेड – डीलीस्टिंग एस्क्रो खाते या नावाने एस्क्रो बँकेत त्यांच्या लखनौ येथील शाखेत खाते उघडले आहे. ऍक्वायरर यांनी १०० % मूल्य एस्क्रो खात्यात म्हणजेच रक्कम रु १६,९९,६६,६२२. २८/– ( भारतीय रुपये सोळा कोटी नव्यान्नव लाख सहासष्ट हजार सहाशे बावीस पैसे अठ्ठावीस मात्र) दिनांक २४ जुलै २०२३ रोजी भरणा केली आहे.

**८. स्वेच्छा डीलीस्टिंगसाठी इक्विटी समभाग सादर करण्याची प्रक्रिया**

ज्या सार्वजनिक समभागधारकांकडे कंपनीचे समभाग डिमॅट स्वरूपात आहेत अशा समभागधारकांसाठी प्रक्रिया :

८.१ ज्या सार्वजनिक समभागधारकांकडे कंपनीचे समभाग डिमॅट स्वरूपात आहेत आणि जयन्ना आपले समभाग स्वेच्छा डीलीस्टिंग प्रक्रियेत सादर करण्याची इच्छा आहे त्या समभागधारकांनी खालील प्रपत्रे इ मेलच्या माध्यमातून अथवा रजिस्टर्ड पोस्टाच्या माध्यमातून किंवा स्पीड पोस्टाच्या माध्यामातून अथवा कुरिअरच्या माध्यमातून (स्वतःच्या जोखमीवर आणि स्वतःच्या खर्चाने) स्कुटर्स इंडिया लिमिटेड – डीलीस्टिंग ऑफर असे ठळकपणे नमूद केलेल्या लिफाफ्यात डीलीस्टिंग ऑफरसाठी रजिस्ट्रार स्काय लाईन फिनान्शिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, पत्ता : डी – १५३– ए, १ ला मजला, ओखला इंडस्ट्रिअल एरिया, फेज १, नवी दिल्ली ११० ०२० भारत दूरध्वनी क्रमांक : ०११– २६८१ २६८२ / ८३ शुक्रवार दिनांक ०५ एप्रिल २०२४ (ऑफर वैधतेची शेवटची तारीख ) रोजी किंवा त्यापूर्वी पोहोचतील अशा बेताने पाठवावीत.

८.१.१ अर्ज, त्यासह स्वाक्षरी केलेले ऑफरचे पत्र त्यासह लागू असलेली कागदपत्रे सादर करावीत.

८.१.२ त्यांच्या डिपॉझिटरी पार्टीसिपंट यांची काउंटर फॉईल किंवा फोटोकॉपी जी डिमॅट इक्विटी समभागांचे डिमॅट एस्क्रो खात्यात हस्तांतरण झाल्याचा पुरावा असेल. खालील प्रमाणे :

१. डीलीस्टिंग ऑफरसाठी रजिस्ट्रार यांना वरील प्रमाणे नमूद करण्यात आलेली कागदपत्रे प्राप्त झाली नाहीत मात्र आवश्यक ते समभाग डिमॅट एस्क्रो खात्यात जमा झालेले असतील तर (खालीलप्रमाणे नमूद करण्यात आल्याच्या अनुसार) ऍक्वायरर असे समजतील की अशा सार्वजनिक समभागधारकांकडून ऑफर स्वीकारण्यात आली आहे.

२. सार्वजनिक समभागधारक यांनी त्यांचे डिमॅट इक्विटी समभाग त्यांच्या संबंधित डिपॉझिटरी खात्यामधून डिमॅट एस्क्रो खात्यात खालीलप्रमाणे नमूद करण्यात आलेल्या तपशिलाच्या अनुसार हस्तांतरित करणे आवश्यक आहे.

| | |
|---|---|
| **एस्क्रो खात्याचे नाव** | **स्कुटर इंडिया लिमिटेड – डीलीस्टिंग** |
| **डिपॉझिटरी** | **नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड (एनएसडीएल )** |
| **डिपॉझिटरी पार्टीसिपंट यांचे नाव** | **निकुंज स्टॉक ब्रोकर लिमिटेड** |
| **डीपी आयडी / क्लायंट आयडी** | **इन ३०२९९४ / १०१११३१६** |
| **कंपनीचे आयएसआयएन** | **आयएनइ९५९इ ०१०११** |

**कृपया नोंद घ्यावी की असे हस्तांतरण ऑफ मार्केटमोड मध्ये करणे आवश्यक आहे. आपले डिमटेरिअलाइज्ड इक्विटी समभाग डिमॅट एस्क्रो खात्यात जमा करण्यात अपयश आल्यास आपले सादरीकरण अवैध ठरेल.**

३. जर आपल्या डिपॉझिटरी पार्टीसिपंटस यांनी इक्विटी समभागांचे ऑनलाईन हस्तांतरण करण्याची तयारी दर्शविल्यास डिलिव्हरी इंस्ट्रक्शन स्लिपच्या छायाप्रती ऐवजी आपण इक्विटी समभागांच्या हस्तांतरणाच्या संदर्भात कॉम्प्युटर जनरेटेड कन्फर्मेशनची प्रत सादर करू शकता. **लक्षात ठेवा की हस्तांतरण ऑफ–मार्केट मोडमध्ये केले जावे.**

४ ही संपूर्णपणे सार्वजनिक समभागधारक यांची जबाबदारी राहील की त्यांचे इक्विटी समभाग वरील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या प्रक्रियेच्या अनुसार डिमॅट एस्क्रो खात्यात जमा झाले आहेत याची खातरजमा त्यांनी करून घ्यावी तसेच त्यांचे अर्ज डीलीस्टिंग ऑफरसाठी नियुक्त करण्यात आलेले रजिस्ट्रार यांच्याकडे ऑफर कालावधीच्या वैधतेच्या मुदतीत प्रस्तुत झाले आहेत याची खातरजमा त्यांनी करून घ्यावी.

५. इक्विटी समभाग तोपर्यंत डिमॅट एस्क्रो खात्यात असतील जोपर्यंत देय मूल्य पूर्ण स्वरूपात संबंधित समभागधारकांना अदा करण्यात येत नाही. आणि कोणत्याही स्थितीत इक्विटी समभाग स्वीकारले नाहीत तर न स्वीकारलेले समभाग सार्वजनिक समभागधारकांच्या संबंधित डिपॉझिटरी खात्यात जमा करण्यात येतील.

६ ही संपूर्णपणे सार्वजनिक समभागधारक यांची जबाबदारी असेल जे डीलीस्टिंग ऑफरसाठी आपले समभाग सादर करीत आहेत की, सर्व परवानग्या मिळविण्यात आल्या आहेत ( ज्यात कॉर्पोरेट, वैधानिक आणि प्राधिकरणीय परवानग्या ), असल्यास. आणि त्यांची पूर्तता डीलीस्टिंग ऑफरसाठी आपले समभाग सादर करण्यापूर्वी झाली आहे आणि त्याच्या संदर्भात अक्वायरर कोणतीही जबाबदारी घेणार नाहीत.

७ डीलीस्टिंग ऑफरसाठी अधिग्रहित करण्यात येणार समभाग ते कोणत्याही शुल्क, भार तसेच त्यासह त्यांच्यावरील हक्क आणि हक्क संबंध यांच्या शिवाय अधिग्रहित करणे आवश्यक आहे.

८ जर सार्वजनिक समभागधारकांना लेटर ऑफ ऑफर प्राप्त झाले नाही किंवा त्यांच्याकडून ते गहाळ झाले असेल तर ते लेटर ऑफ ऑफरची प्रत डीलीस्टिंग ऑफरचे रजिस्ट्रार, स्काय लाईन फिनान्शिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड, पत्ता : डी – १५३–ए, १ ला मजला, ओखला इंडस्ट्रिअल एरिया, फेज १, नवी दिल्ली – ११० ०२० भारत येथे लेखी संपर्क साधून प्राप्त करू शकतात. आणि त्यासाठी लिफाफ्यावर **स्कुटर्स इंडिया लिमिटेड – डीलीस्टिंग ऑफर** असे ठळक अक्षरांत नमूद करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे सार्वजनिक समभागधारक लेटर ऑफ ऑफरची सॉफ्टकॉपी डीलीस्टिंग ऑफरचे रजिस्ट्रार यांचे संकेतस्थळ www.skylinerta.com किंवा डीलीस्टिंग ऑफरचे व्यवस्थापक यांचे संकेतस्थळ www.corporateprofessionals.com येथून डाउनलोड करू शकतात.

९ आपले समभाग सादर करण्याच्या प्रक्रियेच्या संदर्भात कोणत्याही शंका असल्यास आपण डीलीस्टिंग ऑफरचे रजिस्ट्रार आणि डीलीस्टिंग ऑफरचे व्यवस्थापक यांच्याशी संपर्क साधू शकता.

**८.२ सार्वजनिक समभागधारक ज्यांच्याकडे कंपनीचे इक्विटी समभाग प्रत्यक्ष स्वरूपात आहेत त्यांच्यासाठी प्रक्रिया**

८.२.१ सेबी परिपत्रक क्रमांक सेबी / एचओ / सीएफडी / सीएमडी १/ सीआयआर / पी / २०२०/ १४४ दिनांकीत ३१ जुलै २०२० च्या अनुसार सार्वजनिक समभागधारक ज्यांच्याकडे कंपनीचे समभाग प्रत्यक्ष स्वरूपात उपलब्ध आहेत त्यांना डीलीस्टिंग ऑफर अंतर्गत सहभाग घेण्याची / आपले समभाग सादर करण्याची अनुमती देण्यात आली आहे. ज्या सार्वजनिक समभागधारकांना एक्झिट संधीमध्ये सहभाग घेण्याची आणि डीलीस्टिंग ऑफरमध्ये आपले समभाग सादर करण्याची इच्छा आहे त्यांनी पडताळणी प्रक्रियेसाठी खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेली प्रपत्र सादर करणे आवश्यक आहे.

१. मूळ समभाग प्रमाणपत्र

२. वैध समभाग हस्तांतरण अर्ज ज्यावर हस्तांतरक यांची स्वाक्षरी आहे (म्हणजेच सर्व नोंदणीकृत समभागधारक त्याच क्रमाने ज्याप्रमाणे नमुना स्वाक्षऱ्या कंपनीकडे नोंदणीकृत आहेत ) आणि योग्य त्या साक्षी प्रक्रियेने विहित स्थळी जी हस्तांतरणासाठी प्राधिकृत आहे. सत्यापन, जिथे आवश्यक आहे (अंगठ्याचे ठसे, स्वाक्षरीतील फरक आदी ) तिथे न्यायदंडाधिकारी / नोटरी / सार्वजनिक बँक व्यवस्थापक यांनी त्यांच्या अधिकृत शिक्क्यानिशी करणे आवश्यक आहे.

३. पॅनकार्डची स्वयंसाक्षांकीत प्रत ( संयुक्त धारक असतील तर, सर्व हस्तांतरक यांची पॅनकार्डे )

४. योग्यरीत्या स्वाक्षरी केलेला अर्ज ( सर्व सार्वजनिक समभागधारकांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे जिथे ऑफर केलेले समभाग संयुक्तपणे धारण केलेले असतील) आणि त्या क्रमाने ज्या क्रमाने ऑफर करण्यात आलेले समभाग धारण करण्यात आलेले आहेत.

५. अन्य आवश्यक ती प्रपत्रे जसे कि कुलमुखत्यारपत्र, कॉर्पोरेट ऑथोरायझेशन (संचालक मंडळाचा ठराव / नमुना स्वाक्षरी ), मृत्यू प्रमाणपत्राची नोटराइज्ड प्रत, आणि उत्तराधिकार प्रमाणपत्र किंवा इच्छापत्र जर मूळ समभागधारक मयत असेल तर लागू असेल त्या प्रमाणे. त्याच प्रमाणे जर सार्वजनिक समभागधारकाच्या पत्त्यात कंपनीकडे नोंदणीकृत असलेल्या सभासद नोंद पुस्तिकेतील समभागधारकाच्या पत्त्यात कोणताही बदल झाला असेल तर सार्वजनिक समभागधारक यांना पत्त्याच्या पुराव्याची स्वयंसाक्षांकीत प्रत खालील प्रमाणे नमूद करण्यात आलेल्या कोणत्याही पुरावा प्रपत्रासह सादर करणे आवश्यक आहे : वैध आधार कार्ड, वैध मतदार ओळखपत्र किंवा पासपोर्ट

६ संयुक्त धारकांचे घोषणापत्र जे डीलीस्टिंग ऑफरसाठी समभाग सादर करण्याकरिता सहमती दर्शविणारे आहे, लागू असल्यास, आणि

७. वैयक्तिक / अवैयक्तिक समभागधारकांसाठी एफएटीसीए आणि सीआरएस

८.२.२ सार्वजनिक समभागधारक ज्यांच्याकडे कंपनीचे समभाग प्रत्यक्ष स्वरूपात उपलब्ध आहेत त्यांनी कृपया नोंद घ्यावी की इक्विटी समभाग तोपर्यंत स्वीकारले जाणार नाहीत जोपर्यंत प्रपत्रांचा संपूर्ण संच सादर करण्यात येत नाही. ऍक्वायरर यांच्याकडून समभागांचा स्वीकार हा प्रपत्रांच्या पडताळणीस अधीन असेल. डीलीस्टिंग ऑफरसाठी रजिस्ट्रार इक्विटी समभाग / समभाग प्रमाणपत्रे आणि हस्तांतरण अर्ज तोपर्यंत धारण करतील जोपर्यंत ऍक्वायरर डीलीस्टिंग रेग्युलेशन्सच्या अनुसार डीलीस्टिंग ऑफरच्या अंतर्गत अटी आणि शर्तींची पूर्तता करीत नाहीत.

८.२.३ जर कोणत्याही सार्वजनिक समभागधारकाला लेटर ऑफ ऑफरची प्रत प्राप्त झाली नाही किंवा त्यांच्याकडून ती गहाळ झाली असेल तर त्याची प्रत प्राप्त अर्हता येईल आणि त्यासाठी कंपनी किंवा ऑफरस्ताही रजिस्ट्रार यांच्याशी संपर्क साधावा लागेल आणि लिफाफ्यावर स्पष्टपणे **स्कुटर्स इंडिया लिमिटेड – डीलीस्टिंग ऑफर** असे स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक आहे.

८.२.४ डीलीस्टिंग ऑफरच्या अंतर्गत अधिग्रहित करण्यात येणारे समभाग सर्व त्या भारांशिवाय तसेच त्यावरील हक्क आणि हक्क संबंधांशिवाय अधिग्रहित करणे आवश्यक आहे. कोणत्याही भारतास अधीन असलेले समभाग नाकारण्यात येतील.

८.२.५. ही संपूर्णपणे सार्वजनिक समभागधारक यांची जबाबदारी असेल जे डीलीस्टिंग ऑफरसाठी आपले समभाग सादर करीत आहेत की, सर्व परवानग्या मिळविण्यात आल्या आहेत ( ज्यात कॉर्पोरेट, वैधानिक आणि प्राधिकरणीय परवानग्या ), असल्यास. आणि त्यांची पूर्तता डीलीस्टिंग ऑफरसाठी आपले समभाग सादर करण्यापूर्वी झाली आहे आणि त्याच्या संदर्भात एक्वॉयरर कोणतीही जबाबदारी घेणार नाहीत. संबंधित समभागधारक यांनी अशा परवानग्यांची प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

८.२.६. अनिवासी समभागधारकांनी रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय) यांच्याकडून समभागधारकांनी सादर केलेल्या समभागांच्या अधिग्रहणाच्या संदर्भात प्राप्त झालेल्या परवानगीची प्रत सादर करणे आवश्यक आहे. आरबीआय यांची आवश्यक असलेली परवानगी सादर करण्यात न आल्यास, ऑफरसाठी सादर करण्यात आलेले समभाग नाकारण्याचा अधिकार एक्वॉयरर यांनी राखून ठेवला आहे.

८.३ जर इक्विटी समभाग सार्वजनिक समभागधारक यांच्या वतीने त्यांच्या कुलमुखत्यार यांच्याकडून सादर करण्यात आल्यास (पीओए धारक)अर्जावर पीओए धारक यांनी स्वाक्षरी करणे आवश्यक आहे. त्याच प्रमाणे पीओए धारक यांच्या नावे निष्पादित करण्यात आलेल्या कुलमुखत्यार पत्राची प्रत सादर करणे आवश्यक आहे, जर असे मुखत्यारपत्र संबंधित डिपॉझिटरी पार्टीसिपंटस यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आलेले नाही.

८.४ सार्वजनिक समभागधारक याना आवाहन करण्यात येते की त्यांनी खालीलप्रमाणे नमूद करण्यात आलेली कागदपत्रे, लागू असल्यास, अर्जासोबत सादर करावीत

| प्रवर्ग | प्रक्रिया / सादर करण्याची कागदपत्रे |
|---|---|
| **व्यक्तिगत / हिंदू अविभक्त कुटुंब** | १. योग्य रित्या भरलेला आणि नोंदणीकृत समभागधारक यांनी स्वाक्षरी केलेला अर्ज<br>२. योग्यरीत्या निष्पादित करण्यात आलेली डिलिव्हरी इंस्ट्रक्शनची स्लिप / समभागांचे हस्तांतरण स्वीकृत झाल्याची कॉम्प्युटर जनरेटेड पावती (समभागांचे ऑनलाइन हस्तांतरण असल्यास) |
| **कॉर्पोरेट :** | १. योग्यरीत्या भरलेला आणि संचालक मंडळाच्या ठरावानुसार प्राधिकृत करण्यात आलेल्या प्राधिकृत व्यक्तीची स्वाक्षरी असलेला अर्ज<br>२. योग्यरीत्या निष्पादित करण्यात आलेली डिलिव्हरी इंस्ट्रक्शनची स्लिप / समभागांचे हस्तांतरण स्वीकृत झाल्याची कॉम्प्युटर जनरेटेड पावती (समभागांचे ऑनलाइन हस्तांतरण असल्यास) ३. कॉर्पोरेट ऑथोरायझेशन / संचालक मंडळाचा ठराव |
| **कुलमुखत्यार यांच्या वतीने सादर करण्यात आलेली बोली** (पीओए) | १. पीओए धारक यांनी स्वाक्षरी केलेला आणि योग्यरीत्या भरलेला अर्ज<br>२. योग्यरीत्या निष्पादित करण्यात आलेली डिलिव्हरी इंस्ट्रक्शनची स्लिप / समभागांचे हस्तांतरण स्वीकृत झाल्याची कॉम्प्युटर जनरेटेड पावती. ( समभागांचे ऑनलाइन हस्तांतरण असल्यास)<br>३. जर पीओए डिपॉझिटरी पार्टीसिपंट यांच्याकडे नोंदणीकृत करण्यात आलेला नसेल तर पीओए धारक यांच्या नावे निष्पादित करण्यात आलेल्या पीओएची प्रत |
| **कस्टोडिअन** | १ प्राधिकृत व्यक्तीची स्वाक्षरी असलेला आणि योग्य रित्या भरलेला अर्ज<br>२. योग्यरीत्या निष्पादित करण्यात आलेली डिलिव्हरी इंस्ट्रक्शनची स्लिप / समभागांचे हस्तांतरण स्वीकृत झाल्याची कॉम्प्युटर जनरेटेड पावती ( समभागांचे ऑनलाईन हस्तांतरण असल्यास)<br>३. कॉर्पोरेट ऑथोरायझेशन / संचालक मंडळाचा ठराव |

**९ कार्यावलीचे वेळापत्रक**

| तपशील | दिवस आणि तारीख |
|---|---|
| प्राथमिक सार्वजनिक घोषणा | बुधवार दिनांक ०३ मे २०२३ |
| कंपनीच्या संचालक मंडळाने डीलीस्टिंग ऑफरला मान्यता देण्याचा प्रस्ताव संमत करणे | बुधवार दिनांक २४ मे २०२३ |
| कंपनीच्या समभागधारकांनी डीलीस्टिंग ऑफरला मान्यता देण्याचा प्रस्ताव संमत करणे: | बुधवार दिनांक ०५ जुलै २०२३ |
| बीएसईची इन प्रिन्सिपल मान्यता मिळाल्याची तारीख | सोमवार दिनांक ३० ऑक्टोबर २०२३ |
| लेटर ऑफ ऑफर पाठविण्यासाठी समभागधारकांची नावे निश्चित करण्यासाठी विहित करण्याची तारीख * | गुरुवार दिनांक ०७ डिसेंबर २०२३ |
| वृत्तपत्रात जाहिरात सुप्रसिद्ध करण्याची तारीख | शुक्रवार दिनांक ०८ डिसेंबर २०२३ आणि शनिवार दिनांक ०९ डिसेंबर २०२३ |
| लेटर ऑफ ऑफर निर्गमित करण्याची अंतिम तारीख | गुरुवार दिनांक २१ डिसेंबर २०२३ |
| ऑफर उघडण्याची तारीख | मंगळवार दिनांक २६ डिसेंबर २०२३ |
| ऑफर बंद होण्याची तारीख | शुक्रवार दिनांक ०५ एप्रिल २०२४ |
| पडताळणीची आणि ऍक्वायरर यांच्याकडून समभागांचा स्वीकार करण्याची अंतिम तारीख | शुक्रवार दिनांक २६ एप्रिल २०२४ |
| मूल्य अदा करण्याची प्रस्तावित तारीख | मंगळवार दिनांक ३०एप्रिल २०२४ |

सूचना : वरीलप्रमाणे नमूद करण्यात आलेल्या वेळापत्रकात बदल होऊ शकतो आणि जे वित्तीय वर्ष २०२४ करिता सेबी यांच्याकडून सार्वजनिक सुट्ट्यांच्या घोषणेवर अवलंबून असेल.

(*) विहित करण्यात आलेली तारीख ही अशा समभागधारकांची नावे निश्चित करण्याच्या उद्देशासाठी आहे की या तारखेला त्यांना लेटर ऑफ ऑफर पाठविण्यात येणार आहे.

मात्र कंपनीचे सर्व सार्वजनिक समभागधारक डीलीस्टिंग ऑफरमध्ये सहभाग घेण्यासाठी पात्र असतील.

**१० कम्प्लायन्स अधिकारी**

१०.१ कम्प्लायन्स अधिकारी यांचा तपशील खालीलप्रमाणे नमूद करण्यात आल्यावर आहे.

**नाव : श्री राज शेखर तिवारी पत्ता** : ३/ ४८१, १ ला मजला, विकल्प खंड, गोमती नगर, लखनौ, उत्तर प्रदेश २२६ ०१० इ मेल : csscootersindia@gmail.com

**दूरध्वनी क्रमांक : ०५२२– ३१७८४९०**

१०.२ जर सार्वजनिक समभागधारकांना जमा प्राप्त न होणे, ऑफरसाठी अदायगी किंवा डीलीस्टिंग प्रक्रिया आणि पद्धती यांच्या संदर्भात कोणत्याही शंका असतील तर त्यांनी ऑफरचे रजिस्ट्रार किंवा ऑफरचे व्यवस्थापक यांच्याशी संपर्क साधावा.

| डीलीस्टिंग ऑफरसाठी व्यवस्थापक | डीलीस्टिंग ऑफरसाठी रजिस्ट्रार |
|---|---|
| Corporate Professionals<br>**कॉर्पोरेट प्रोफेशनल्स कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड**<br>डी – २८, साऊथ एक्स्टेंशन भाग १, नवी दिल्ली ११० ०४९, भारत<br>**संपर्कासाठी व्यक्ती : श्रीमती अंजली अगरवाल**, दूरध्वनी क्रमांक : ०११– ४०६२ २२३० / ४०६२ २२०९<br>**इ मेल** :mb@indiacp.com **संकेतस्थळ** :www.corporateprofessionals.com<br>**सेबी नोंदणी क्रमांक** : आयएनएम ०००० ११४३५<br>**वैधतेचा कालावधी** : स्थायी<br>**कॉर्पोरेट ओळख क्र.** : यू७४८९९डीएल २०००पीटीसी १०४५०८ | Skyline Financial Services Pvt. Ltd. Towards Excellence<br>**स्काय लाईन फिनान्शिअल सर्व्हिसेस प्रायव्हेट लिमिटेड**<br>डी – १५३– ए, १ ला मजला, ओखला इंडस्ट्रिअल एरिया, फेज – १, नवी दिल्ली ११० ०२०, भारत<br>**संपर्कासाठी व्यक्ती : श्री. पवन सिंग बिश्त** : दूरध्वनी : ०११– २६८१२६८२ / ८३ आणि ६४७३२६८१ ते ८८<br>**इ मेल** : admin@skylinerta.com **संकेतस्थळ** : www.skylinerta.com<br>**सेबी नोंदणी क्रमांक** : आयएनआर ००००३२४१<br>**वैधतेचा कालावधी** : स्थायी<br>**कॉर्पोरेट ओळख क्र.** : यू ७४८९९डीएल १९९५ पीटीसी ०७१३२४ |

**दिनांक : ०६/१२/२०२३**
**स्थळ : जगदीशपूर**

**ऍक्वायरर यांच्या वतीने आणि त्यांच्या करिता**
**स्वाक्षरी / –**
**अमित श्रीवास्तव**
**अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक**

